ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 7 | MARCH - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आर्थिक विचारवंत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर



प्रा. घोडके वंदना किसन[१] , डॉ. जगदीश छबुराव सोनवणे[२]
[१]डॉ.एन.जे.पाऊलबुधे महिला महाविद्यालय, अहमदनगर.
[२]मार्गदर्शक, (प्राध्यापक), मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई, ता. नेवासा, जी. अहमदनगर महाराष्ट्र.

डॉ. आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून सर्वज्ञात आहेतच त्याचप्रमाणे एक प्रकांड पंडित, नामवंत शिक्षणतज्ञ, सव्यसाची पत्रकार, महान समाजसुधारक आणि दीन–दलितांचे कैवारी म्हणूनदेखील डॉ. आंबेडकरांची प्रतिमा जनमानसामध्ये रुजली आहे. त्यांच्या बहुरंगी आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्वाचा एक विषेश पैलू सर्व जनतेला परिचित आहे. डॉ.आंबेडकर म्हणजे जागतिक आर्थिक तज्ञ म्हणून त्यांना ओळखले जाते. डॉ. आंबेडकर हे सर्वांगीण व्यक्तिमत्व होते. ते एक प्रशिक्षित आणि व्यासंगी अर्थतज्ञ होते. त्यांनी त्यांचा एम.ए चा प्रबंध १९१५ आणि पी.एच.डी १९२४ चा शोधनिबंध हे दोन्हीही कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात केले होते. त्यांच्या एम.ए.च्या प्रबंधाचा विषय 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त' हा होता तर पी.एच.डी. साठी त्यांनी 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताचा उगम' या विशयाचा अभ्यास केला. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लंडन विघापीठाने त्यांना १९२४ मध्ये डी.लिट् ही पदवी 'रुपयाची समस्या : उगम आणि उपाय' या प्रबंधासाठी बहाल केली. 'रुपयाचा प्रश्न' हा प्रसिध्द ग्रंथ त्यांनी डॉ. कॅनन यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. प्रा. सेलिग्मन हे जगातील नामवंत आर्थिक विचारवंत डॉ. आंबेडकरांचे मार्गदर्शक होते.

## डॉ.आंबेडकर यांचे वेठबिगारविषयक विचार :–

वेठबिगारी हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाला कलंक लावणारी बाब आहे. कारण भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जे काही क्षेत्र आहे त्या क्षेत्रामध्ये जे काही श्रमिकवर्ग काम करतात ते श्रमिक अस्पृष्य समाजातील असतात आणि त्यांचे आर्थिक जीवन हे फार हलाखीचे असते. कारण त्यांना उदरनिर्वाहसाठी पुरणारे वेतन किंवा मजुरी मिळत नाही; परंतु भारतीय समाज अर्थव्यवस्थेत वेठबिगार हा उच्चवर्णीयांनी जाणीवपूर्वक घडवून आणलेला प्रकार आहे. हा प्रकार उच्चवर्णीयांसाठी फार फायदेषीर ठरत असल्यामुळे काळानुसार या वेठबिगारीचे फारच आर्थिक हाल झालेले दिसतात.

भारताच्या ग्रामिण भागामध्ये जे कृशी क्षेत्र आहे त्या क्षेत्रामध्ये कृशी मजूर किंवा वेठबिंगार काम करतात त्या वेठबिगारांना त्यांच्या कामाच्या मोबदल्यात फारच कमी मोबदला मिळतो. त्यामुळे त्या वेठबिगारांना आपले जीवन अत्यंत दरिद्री अवस्थेतच जगावे लागते. म्हणून वेठबिगार ज्या भागात किंवा खेडयात राहतात त्यांची जी राहण्याची जागा असेल किंवा त्यांच्या शेताचा अल्पसा भाग असेल तो भाग आणि राहण्याची जागा हे गावातील सावकारकडे गहाण तारण म्हणून ठेवतात व ते सावकाराकडून किंवा जमीन मालकाकडून आपल्या स्वत:च्या गरजा भागवण्यासाठी मोठया व्याजदराने कर्ज काढतात. हे कर्ज काढत आसताना कर्जाचे व्याजदर अवास्तव असतात. कारण वेठबिगारीची

प्रथा भारतात फार जुन्या काळापासून प्रचलित आहे. ग्रामिण जनतेच्या दारिद्रयामुळे, अज्ञानामुळे, निरक्षरतेमुळे ही पध्दती वर्षानुवर्षे सुरु राहिलेली आहे. यामध्ये अस्पृश्य महार, मातंग, चांभार आदिवासी, भटक्या जमाती, पराधी, लोहार, सुतार, न्हावी, धोबी, शिंपी, माळी, मराठा इत्यादि मजूर वर्ग या प्रथेखाली पिढयान् पिढया पिचत राहिले. कारण अगोदरच असलेल्या दारिद्रयामुळे एकदा कर्जाच्या चक्रामध्ये शिरल्यावर केवळ गुलाम म्हणूनच जगावे लागते.

वेठबिगार वर्गातील मजूर जाणीवपूर्वक कर्ज घेत नाहीत तर उच्चवर्णीय व सावकार वर्ग हे पूर्वीपासून याचे आर्थिक शोषण व पिळवणूक करतात. कारण वेठबिगार हे अस्पृश्य समाजातल असल्यामुळे उच्चवर्णीयांचा बघण्याचा दुष्टिकोन चांगला नसतो. वेठबिगारांना त्यांच्या कामाचा मोबदला दिला जातो तो फारच कमी असतो तर कधी काहीच मिळत नाही. या वर्गामध्ये दारिद्रय वाढतच जाते. त्यामुळेच आर्थिक विषमता वाढलेली दिसून येते. भारतातील शेती क्षेत्र हे कोरडवाहू असल्यामुळे सर्वसामन्य शेतमजुरांना पूर्ण वर्षभर काम मिळत नाही तर त्यांना वर्षाकाठी काही हंगामापुरतेच काम मिळते व जे काम मिळते तो फार थोडया दिवसांसाठी असल्यामुळे कामाचा मोबदलासुध्दा फारच कमी असतो. त्यामुळे त्यांना नाइलाजास्तव सावकारांकडून किंवा जमीनदरांकडून कर्ज घेऊन पोट भरण्याशिवाय इलाज नसतो. परंतु कर्ज घेते वेळेस गहाण ठेवलेली कोणतीही संपत्ती किंवा जमीन नसल्यामुळे त्यांच्याजवळ फक्त एकच साधन असते आणि ते म्हणजे शारीरिक श्रम होय. त्यामुळे वेठबिगार सावकाराकडे कर्ज फिटेपर्यंत राहतात किंवा आपल्या कुटुंबातील मुलांना ठेवतात. सावकारच्या शेतीची, घराची व अन्य कामे त्या वेठबिगारांना करावी लागतात.

वेठबिगार पध्दतीच्या बाबतीत तामिळनाडूमधील उत्तर व दक्षिण अर्काट कर्नाटकातील शिमोगा, महाराष्ट्रातील अहमदनगर व वन विभाग, गुजरातेतील बडोदा, मध्य प्रदेषातील सतना, डहाडोला व बस्तर, बिहारमधील पालम, उत्तर प्रदेशातील देवरिया इत्यादि जिल्हयांत वेठबिगारीचे प्रमाण सर्वात जास्त होते.

वेठबिगारी कमी करण्यासाठी ज्या काही उपाययोजना केल्या आहेत त्यांचा परिपूर्णपणे वापर करावा. कारण घटक राज्याच्या विधानसभेत नुसता वेठबिगारीचा कायदा करुनही सुसंस्कृत समाजाला बहाल करण्याची पध्दत नष्ट होणार नाही.

## डॉ. आंबेडकराचे उद्योगविशयक आर्थिक विचार :—

ज्या देशामध्ये भांडवलशाहीचा उदय झाला तो देश इंग्लड व युरोपातील देशांचा औद्योगिकीकरणामुळे जलद आर्थिक विकास घडून आला हे डॉ. आंबेडेरांनी पाहिलेले होते. त्यामुळे त्यांच्या मते, भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगिकीकरण होणे फार महत्वाचे आहे. त्यांच्या मते देशामध्ये उद्योगधंद्यांचा विकास करीत असताना औद्योगिकीकरणातून आर्थिक विषमता व आर्थिक संपत्तीची मक्तेदारी किंवा विकेंद्रीकरण होता कामा नये. तसेच प्रादेशिक औद्योगिक असमतोलही होता कामा नये.

देशामध्ये समतोल विकास व्हावा यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शासनाने प्रत्यक्ष लक्ष घलून समतोल औद्योगिक विकास साध्य करावा असे त्यांना वाटत होते. सार्वजनिक मालकीचे काही मूलभूल स्वरुपाचे उद्योग शासनाने चालवावेत अशा प्रकारचे उद्योग सुरु करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. सरकारने उद्योग सुरु करण्यासाठी काही महामंडळांची स्थापना करावी व विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करावे.

उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर त्यास शासनाचा मालकी हक्क प्रस्थापित झाल्यामुळे त्या उद्योगधंद्यांवर शासनाचे नियंत्रय असते. त्यामुळे शासन ही प्रशासकीय संस्था सामाजिक लोककल्याणाच्या हेतूने प्रेरित झालेली असते. त्यामुळे उत्पादनात वाढ होईल. कामगारांना योग्य वेतन मिळेल. नागरिकांना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळेल. उदा. नैसर्गिक आपत्ती, अपघात, आजार, पेन्शन, वृध्दापकाळ या प्रसंगांना शासनाकडून वित्तीय आर्थिक मदत मिळेल असे बाबासाहेबांचे मत होते.

भारतात उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी सरकारने पुढाकार घेऊन उद्योग स्थापन करण्यास लोकांना प्रोत्साहन द्यावे. त्याचप्रमाणे उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता वाढावी यासाठी त्यांना शिक्षण व प्रशिक्षणाचा कार्यक्रम हाती घ्यावा. उद्योगधंदा वाढविण्यासाठी शासनाने मूलभूत वाहतूक किंवा दळणवळणाच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

भारताचा औद्योगिक विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा केल्यास औद्योगिक प्रगती साध्य होईल. राष्ट्रीय उत्पादनात वाढ होईल आणि उत्पादनात वाढझाल्याने देशातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारेल व दारिद्रय कमी होण्यास मदत होईल. परंतु संपत्ती आणि उत्पादनाचे समानतेने वाटप झाले तरच हे शक्य आहे. केवळ उद्योगाचा विकास झाला, उत्पादन वाढले परंतु उत्पादित वस्तूंचे असमानतेने वितरण झाले तर दारिद्रय दूर होणार नाही. केवळ कृषी क्षेत्राच्या आधारे देशाची प्रगती होऊ शकणार नाही याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगिकीकरण आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

भारताच्या शेती क्षेत्रामध्ये फार मोठया प्रमाणात बेरोजगारी आहे. त्यांना काम मिळत नाही म्हणून या कृषी क्षेत्रातील मजुरांना उत्पादन कार्यामध्ये गुंतविण्यासाठी औद्योगिकीकरणावर शासनाने भर दिला पाहिजे. विशेषत: उद्योगधंदे शहरी भागात उभारले जावेत. कारण शहरी भागांत मूलभूत सुविधा उपलब्ध असतात. त्याचबरोबर रोजगार प्राप्त करण्यासाठी ग्रामीण भागांतून नागरी भागांकडे कामगारांचे स्थलांतर होईल. यातील बरेचसे कामगाार भूमिहीन आणि सामाजिक, आर्थिक,राजकीयदृष्टया मागास समाजातील असतील.

भारतातील ग्रामीण भागात जो कामगार जो कामगार वर्ग असतो हा बहुजन वर्ग असतो. या बहुजनांच्या गरजा लक्षात घेतल्यानंतर जर देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास साध्य करावयाचा असेल तर आर्थिक विकासाचाच एक भाग म्हणून औद्योगिकीकरणास प्राधान्य द्यावे. म्हणूनच भारताचे पहिले औद्योगिक धोरण १९४८ व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये १९५६—६१ औद्योगिकीकरणास प्राधान्य दिलेले आढळते.

## डॉ.आंबेडकरांचे शेतमजुरांविषयी विचार :—

भारतातील शेतमजूर आपल्या उपजीविकेचे साधन म्हणून दुसऱ्याच्या शेतजमिनीवर अवलंबून असतो. तो ज्या शेतजमिनीमध्ये राबतो त्याच्यावर त्याचा मालकी हक्क नसतो. शेतमजूर काम करीत असताना वेळ, कामासंबंधीचे निर्णय शेतमजुराला घेता येत नाहीत. त्याला मिळणारा जो मोबदला असतो तो फक्त मजुरीच्या स्वरुपात असतो, तो लाभाच्या स्वरुपात नसतो.

डॉ.आंबेडकरांच्या मते शेतमजूर म्हणजे जवळजवळ गुलामाचीच स्थिती आहे. ज्या शेतमजुरांना आपल्या जमीनमालकासाठी ज्या काही सेवा कराव्या लागतील त्या संपूर्ण सेवा शेतमजुरांनी कराव्यात. त्यापैकी काही सेवा तर विनामुल्य असतात तर काही सेवांबद्दल त्या शेतमजुरांना नाममात्र मोबदला मिळतो. त्यामुळे अशा शेतमजुरांची स्थिती अत्यंत दयनीय व शोचनीय असते. बहुतेक शेतमजूर हे महार, मातंग व चांभार इतर मागास जमातींतील असतात. त्यामुळे या जातींच्या शेतमजुरंचा आर्थिक विकास झालेला दिसून येत नाही.

भारतातील निरनिराळया विभागांतील शेतमजुरांची स्थिती भिन्न आहे तरीसुध्दा सर्वच शेतमजुरांची स्थिती औघोगिक कामगारांच्या स्थितीपेक्षा बऱ्याच कमी प्रतीची आहे. एवढेच नव्हे तर तो अत्यंत कष्टमय आहे. भारतातील शेतमजूर हजारो खेडयांत विखुरलेले आहेत. या शेतमजुरांचे वेतन दर वेगवेगळया प्रदेशात फार कमी आहेत.

डॉ. बाबासाहेबांच्या मते, भारतातील शेतमजूर असंघटित असल्याचे दिसून येते. याला अनेक कारणे जबाबदार आहे. भारतामध्ये सर्वत्र पसरलेली निरक्षरता, अज्ञान, दारिद्रय, विशेष म्हणजे जातीसंस्थेचा पगडा आहे. म्हणून अस्पृश्य समाजातील शेतमजुरांना पाहिजे ती किंमत त्यांच्या श्रमानुसार देत नाही. तसेच शेतमजुरांजवळ विविध प्रकारच्या रोजगारांसाठी आवश्यक ते कौशल्य नसल्यामुळे त्यांना अन्य व्यवसायांत प्रवेश करता येणार नाही. त्याच प्रकारे बहुसंख्य शेतमजुरांची कुटूंबे कर्जबाजारी असतात. एखाद्या मजुराने आपली गरज भागविण्याकरिता

सावकाराकडून कर्ज घेतल्यास हा सावकार मजुराला पूर्णपणे पिळून काढल्याशिवाय राहत नाही. या देशाला स्वातंत्र्य मिळूनसुध्दा मजुरांला गुलामीचे जिणे जगण्यासाठी भाग पाडले जाते. ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी आहे.

शेतमजुरांच्या प्रश्नांकडे शासनाचे सुध्दा लक्ष नसते. कारण नियोजन मंडळाने केलेले दुर्लक्ष आपणास दिसून येते.

## डॉ.आंबेडकरांचे औद्योगिक श्रमाचे विचार —

औद्योगिक श्रम हा उत्पादनाचा एक महत्वाचा भाग आहे. आर्थिक फायद्याच्या दृष्टीने केलेल्या बौध्दिक अथवा शारीरिक श्रम असे म्हणतात. श्रमांची विक्री करणाऱ्या व्यक्तीस श्रमिक किंवा कामगार असे म्हणतात. विविध कौशल्य असणारे श्रमिक आपापल्या पात्रतेप्रमाणे रोजगार मिळविण्याचा प्रयत्न करतात. विविध उद्योगधंद्यांचे मालक श्रमिकांच्या श्रमाची खरेदी करतात.श्रम हा एक महत्वाचा उत्पादक घटक असल्याने या घटकाला उत्पादन क्षेत्रातून मोठी मागणी येते. त्यामागणीनुसार श्रमिक आपला श्रमपुरवठा करण्याचा प्रयत्न करतात. डॉ.आंबेडकरांच्या मते देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी कोणत्याही क्षेत्रामध्ये जे श्रमिक मोबदला मिळविण्यासाठी केलेले बौध्दिक किंवा शारीरिक काम होय.

डॉ. आंबेडकरांच्या मते, श्रमांच्या मागणी—पुरवठयात योग्य समन्वय साधला जात नाही. श्रमबाजारात अपूर्णता निर्माण होते. श्रमिक संघटित असतात. त्यांची सौदाशक्ती कमी असते. श्रम बाजारावर त्यांचे फारसे प्रभत्व नसते. या परिस्थितीचा मालकवर्ग गैरफायदा घेतात. श्रमिकांना कमी वेतनावर काम करण्यासाठी भाग पाडतात.

उद्योगधंद्यांच्या ठिकाणी त्यांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देत नाहीत. तथापि संघटित क्षेत्रातील श्रमिक संघटन शक्तीच्या बळावर आपल्या मागण्या मान्य करुन घेतात. उच्च वेतन दर, बोनस व इतर सुविधा प्राप्त करतात. अशा श्रमिकांचे शोषण होत नसले तरी एकूण श्रमिक संख्येच्या तुलनेत त्यांचे प्रमाण खूप कमी असते.

औद्योगिक उत्पादन प्रक्रिया सुरक्षितपणे व समाधानकारक रीतीने चालू राहण्यासाठी मालक व औद्योगिक कामगार यांच्यामधील वाद कमी केले जाऊन त्यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध प्रस्तापित होणे व ते टिकवून ठेवणे देशाच्या औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक असते. याबाबतीत असे धोरण स्वीकारले जावे की ज्यामुळे मालक, औद्योगिक कामगार आणि उपभोक्ते या सर्व गटांचे हित साधले जाईल. त्याचबरोबर औद्योगिक श्रमिकांना योग्य वेतन दिले जाण्याच्या दृष्टीने व त्यांना औद्यागिक व्यवस्थापनात सहभागी करुन घेण्याच्या दृष्टीने योग्य अशी यंत्रणा निर्माण केली जावी.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक आर्थिक विचार : —

डॉ. बाबासाहेबांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर शेती क्षेत्र हे फार महत्वाचे क्षेत्र आहे असे सांगितले. डॉ. बाबासाहेबांच्या मते शेती व्यवसायाबरोबर जोडधंधा म्हणून शेतीपासून समाजाला पशुधन, सुवर्ण, वन उत्पादन बाबी व्यापारासाठी फार महत्वपूर्ण ठरु शकतात.

डॉ. बाबासाहेबांनी व्यवसायाच्या दुष्टीने शेतीला प्रमुख महत्व दिलेले आहे. त्यामुळेच त्यांनी शेतीचे राष्टीयीकरण करावे असे मत मांडले होते. शेतीचा विकास करण्यासाठी वित्तीय गरज फार महत्वाची आहे. त्यासाठी सरकाने वित्तीय बॅकअंतर्गत शेतकरी वर्गास कृषी कर्जाची हमी द्यावी. डॉ बाबासाहेबांच्या मते, ग्रामीण भागाच्या विकासासाठी शेतीचा विकास जसा महत्वाचा आहे तशाच प्रकारे शेतीवर आधारित उद्योग आणि लघुउद्योगांचा विकासही महत्वाचा आहे. कारण राष्ट्राच्या संपत्तीत वाढ करण्यासाठी शेतीचा विकास साध्य केला पाहिजे. शेतीच्या विकासासाठी शेती उत्पादनात वाढ करणे आणि भारतात आस्तित्वात असणारी जमीनदार पध्दत नष्ट करणे आवश्यक आहे. शेतीच्या उत्पादनवाढीसाठी जमीनदार यांची परिस्थिती शेतमजुरांनी, भूमिहीनांनी केलेल्या श्रमांमुळेच सुधारली आहे. तसेच जमीनमालक, जमीनदार श्रीमंत झाले परंतु शेतीवर राबणारे, घाम गाळणारे शेतमजूर मात्र

गरीबच राहिलेल दिसतात. म्हणून डॉ. बाबासाहेब म्हणतात, जोपर्यत जमीन कसणाऱ्या व घाम गाळणाऱ्या शेतमजुरांच्या मालकीच्या जमिनी होत नाहीत तोपर्यंत शेतीची प्रगती होणे शक्य नाही.

भारतीय कृषी अर्थव्यवस्थेत जमीनदार व व्यापारी वर्ग हे शेतकऱ्यांचे शोषण करतात असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. कारण शेतकऱ्यांना आपला शेतमाल स्थानिक (ग्रामिण) व्यापाऱ्यांना कमी किंमतीत विकावा लागतो आणि त्यांच्याकडून तंत्राव्दारे शुध्द तयार झालेल्या उपभोग वस्तू जादा किमतीला खरेदी कराव्या लागतात. कमी किमतीला उपभोग्य वस्तू खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना सावकार वर्गाकडून कर्ज काढावे लागते. परिणामी शेतकरी वर्ग कर्जबाजारी होतो. अशा प्रकारे व्यापारी व सावकारी वर्ग शेतकऱ्याचे, शेतमजुरांचे शोषण करतात.

डॉ. आंबेडकरांनी १९३६ च्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यात आणि घटना समितीला सादर करण्यासाठी लिहिलेल्या 'स्टेटस् ॲण्ड मायनॉरिटीज' या पुस्तकात असे स्पष्ट केले आहे की, शेतजमिनींचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करावे आणि सामुदायिक पद्धतीने शेतीच्या लागवड पद्धतीचा अवलंब करावा. भारताच्या एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचा विकास झाल्याषिवाय सुधारणा होणार नाही याची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती. त्यांचे शेती क्षेत्राविषयी थोडक्यात मत पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. शेती क्षेत्राची अल्प उत्पादकता.
२. शेतजमिनींची आकारमान लहान.
३. वेगवगळया ठिकाणी विखुरलेली.
४. शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण.
५. वारसहक्काचा नियम.
६. शेतीला वित्तीय पुरवठयाचर अभाव.
७. वाढत्या लोकसंख्येचा दबाव.
८. शेती सामुदायिक पद्धतीने केली जात नाही.
९. शेती क्षेतात कोरडवाहूचे जास्त प्रमाण.
१०. शेतकरी कामगारांना सुरक्षिततेची हमी नाही.
११. जमीनदारी पद्धती
१२. अशिक्षित शेतकरी वर्ग
१३. भारतीय शेतकरी वर्गाचे दारिद्रय.

## डॉ.आंबेडकरांचे कामगारविषयक आर्थिक विचार :—

डॉ. आंबेडकरांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये मूठभर लोकांच्या हातात उत्पादनांच्या सर्व साधनांचे केंद्रीकरण झालेले असते. त्या व्यक्तींनाच भांडवलदार असे म्हणतात. प्रत्येक कारखान्यात हजारो मजूर राबतात. भांडवलदार सर्व दृष्टीने संपन्न व सामर्थ्यवान असतात तर कामगार दुर्बल व गरीब असतात. जास्तीत जास्त नफा मिळविण्याच्या उद्देशाने भांडवलदार कामगारांची पिळवणूक करीत राहतात.

डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या चळवळीविषयी असे मत स्पष्ट केले की कामगार संघाची ही चळवळ देशात जसजशी मूळ धरु लागली तसतशी ही चळवळ दडपून टाकण्यासाठी कारखानदारांनी नेटाने प्रयत्न करण्यास सुरुवात केली.

भारतातील कामगारांना कर्जबाजारी आणि वैफल्याच्या भावनेने ग्रासलेले असल्याने त्यांना संघटित करण्यासाठी योग्य नेतृत्वाची फार आवश्यकता आहे. ही आवश्यकता केवळ लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये कामगारांना संघटित होण्याचे व संघटनेच्या स्वातंत्र असते. भारतीय राज्यघटना लोकशाही तत्वावर आधारित असावी. ती कामगाराच्या इतर हक्कांबरोबर लोकशाही कामगारांच्या संप करण्याच्या हक्कालाही मान्यता मिळेल. लोकशाहीमुळेच

हक्काचा उपयोग करुन आपली आर्थिक परिस्थिती कशी सुधारावी व समाजामध्ये सामाजिक दर्जा कसा वाढवावा हे प्रश्न केवळ लोकशाहीमुळेच सुटू शकतात.

डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीअभावी शासन व्यवस्थेचा आर्थिक विकास कसा खुंटतो किंवा कामगारंच्या संघटनांची अशी वाताहत होते हे युरोपातील इटली, जर्मनी देशांच्या स्थितीतून सांगितले. असे मौलिक विचार डॉ. आंबेडकरांनी आपल्या लिखाणातून व्यक्त केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक विचार भारतात राहणाऱ्या ७५ टक्के शेतमजुरांसाठी जवळ ६० टक्के असणाऱ्या ग्रामीण व शहरी गरिबांसाठी, कामगारांसाठी हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. ८५ टक्के लोकसंख्या असणारा हा मानव समूह या देशाचा सच्चा देशभक्त असून या देशातील सर्वात मोठा समाज आहे.
स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्व यावर आधारलेली समाज व्यवस्था व अर्थव्यवस्था निर्माण करणे हे डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचे ध्येय होते व तेच त्यांचे तत्वज्ञान होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निष्णात अर्थतज्ञ होते. त्यांनी सैद्धांतिक, व्यावहारिक तसेच आर्थिक दृष्टिकोनातून भारतीय अर्थविकासाची नाडीपरीक्षा केली आहे. ते म्हणतात, भांडवलशाही ही श्रमिकांची, गरिबांची शत्रू आहे. संपूर्ण रोगांचे मूळ कारण आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रांत असमानता हवी होती. भांडवलशाही कल्याणकारी अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था कधीच एका म्यानात बसणार नाहीत असे त्यांचे मत होते.

भांडवलदारांमध्ये जास्तीत जास्त भर खाजगीकरणावर दिला जातो. कारखानदार जास्तीत जास्त नफा मिळावा या प्रेरणेने झपाटलेले असतात. नफा मिळविण्यासाठी सर्व प्रकारचे मार्ग अवलंबिले जातात. आपल्या देशाच्या संदर्भात किमान लोकांचे म्हणजेच १५ टक्के उच्च जातीचे व जमाती व इतर मागास जातींचा समावेश होतो. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर शोषणमुक्त समाज व्यवस्थेचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांच्या मते शोषणाला आर्थिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय असे अनेक पैलू असतात आणि भारताच्या संदर्भात व सामाजिक व धार्मिक पिळवणुकीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे मानवी जीवनाची व मूल्यांची गळचेपी झाली आहे. असे म्हणतात की, आर्थिक संबंधच मानवी जीवनाचे सर्वस्व असतात. म्हणून आर्थिक प्रेरणाच सर्व मानवी व्यवहारांना गती देतात. परंतु हे त्यांनी अमान्य केले. एकढेच नव्हे तर त्यांना कोणत्याही प्रकारची हुकूमशाही मान्य नव्हती. त्यामुळे त्यांनी कामगारवर्गाची हुकूमशाही सुद्धा अमान्य केली.

डॉ. आंबेडकरांना राज्य समाजवाद या देशाने स्वीकारावा असे वाटत असे. कारण समाजवादात जास्तीत जास्त राबवून कमाल लोकांचे कल्याण करण्याचा प्रयत्न केला आहे. शोषणमुक्त समाज शासन समाजवादात शक्य आहे असे डॉ. आंबेडकरांनी हे आर्थिक विचार मांडले ते थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत.

१. डॉ. आंबेडकरांना नियोजनबद्ध अर्थव्यवस्था अभिप्रेत होती.
२. देशात मिश्र अर्थव्यवस्था असावी.
३. शासनाच्या अर्थव्यवस्थेत परिणामकारक हस्तक्षेप असणे आवश्यक आहे.
४. मुख्य उद्योगधंदे राज्याच्या मालकीचे असावेत आणि तेही राज्याव्दारे किंवा शासनाने स्थापन केलेल्या मंडळांव्दारे चालविले पाहिजेत. म्हणजेच राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने अतिमहत्वाचे आणि आधारभूत उद्योग तसेच देश संरक्षणाचे उद्योग व सेवा सरकारी मालकीचेच असावेत, असा डॉ. आंबेडकरांचा ठाम विचार होता. खाजगी क्षेत्रालाही योग्य तो वाव द्यावा.
५. राज्य समाजवादाची संकल्पना डॉ. आंबेडकरांनी मांडली.
६. विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करावे.
७. कृषी विचार –
अ) कृषी व्यवसायांचे राष्ट्रीयीकरण करावे.

ब) गरीब शेतकरी आणि शेतमजूर यांना लाभ मिळेल अशा तऱ्हेने जमिनीचे फेरवाटप करावे.

क.) शेतीचे सामुदायिकीकरण करावे

ड) शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी सरकारने भांडवल गुंतवणुकीवर अवलंबमन राहावे.

इ) शेतीतील अतिरिक्त मुनष्यबळ कमी करण्यासाठी औद्योगिकरण जास्त जोरात करावे.

ई) शेतीचे यांत्रिकीकरण करावे, सरकारी पद्धतीने शेती करावी.

८. राखीव जागांची तरतूद.

९. वर्ग—जाती—स्त्रीदास्यमुक्ती अर्थव्यवस्थेचा पुरस्कार.

अशा रीतीने सर्वसमावेशक, कल्याणकारी अर्थव्यवस्थेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुरस्कार केला हे त्यांच्या आर्थिक विचारांचे सार आहे.

## संदर्भ—

१. भारतीय आर्थिक विचारवंत —डॉ. सुखदेव महादजी खंदारे

२. अर्थषास्त्रीय विचारांचा अभ्यास —प्रा. के.एच ठक्कर

३. अर्थषास्त्रीय विचार —डॉ. वि.मा बाचल

४. रायटिंग्ज अॅण्ड स्पीचेस, खंड ३ —डॉ. आंबेडकर (महाराश्ट्र षासन प्रकाषन. मुंबई )

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जिवन चरित्र —धनंजय कीर